Impact Factor - 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.71

## Significance Of Fairs And Festivals In Human Life

Chief Editor

Pramod P. Tandale

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

TRUE COPY

Principal,
Rajarshi Ch. Shahu College
Kolhapur

TRUE COPY

Principal,
Rajarshi Ch. Shahu College

| Sr. No. | Name of the Researcher | Title of The Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 92 | प्रा. संदीप वसंत चौरे | आदिवासी कोकणी समाजातील डोंगऱ्यादेव उत्सव: एक अभ्यास | 306 |
| 93 | प्रा. रघुनाथ चंदर गवळी | आदिवासींचे लोकोत्सव आणि कृषीसंस्कृती | 310 |
| 94 | डॉ. राजश्री बंडोपंत पोवार | 'कहार' समाजाचे सण-उत्सव व लोककला | 313 |
| 95 | डॉ. रंजनाबाळासाहेब पाटील | सण - उत्सव व संस्कृतीचे जतन | 316 |
| 96 | डॉ. एम. बी. देसाई | भारतीय सणांचा आध्यात्मिक अर्थ | 321 |
| 97 | श्री. रावसाहेब हरी पाटील | सण, उत्सव, महत्व व उपयुक्तता | 324 |
| 98 | प्रा. संगिता सुर्यवंशी | आदिवासी कोकणी जमातीतील सामाजिक आणि सांस्कृतिक अन्वयार्थ | 326 |
| 99 | प्रा. डॉ. संजय पि. चिंदगे | मिथिलेश्वर और आनंद यादव की कहानियों में चित्रित त्योहारों तथा उत्सव पर्वों का महत्व | 331 |
| 100 | डॉ. शाहीन एजाज जमादार | हिंदी उपन्यासों में चित्रित भारतीय मुस्लिमों का सांस्कृतिक जीवन | 333 |
| 101 | डॉ. शामला माने<br>डॉ.शैलजा माने | सण उत्सवांचे पारंपारिक व धार्मिक महत्व | 336 |
| 102 | डॉ. शर्वरी कुलकर्णी | पर्यावरणपूरक होळी काळाची गरज | 341 |
| 103 | प्रा. शशिकांत महादेव मोहिते | सण-उत्सवातील श्रध्दा व अंधश्रध्दा आणि 'अंनिस'ची भूमिका: एक अभ्यास | 344 |
| 104 | तृप्ती आनंदा वडर | त्योहारो का सामाजीक एवं ऐतिहासिक महत्व | 349 |
| 105 | सौ रोहिणी गुरुलिंग खंदारे (धनवडे) | त्यौहार और लोकसाहित्य | 352 |
| 106 | यु. एस. खोत<br>डॉ. मंजुषा मोळवणे | स्त्रियांमधील कौशल्ये आणि सण-उत्सव | 357 |
| 107 | प्रा. वैशाली श्रीकांत गुंजेकर | प्रवासवर्णन : परदेशातील सण-उत्सवांचे चित्रण | 361 |
| 108 | वैष्णवी पाटील | सण उत्सवातील खाद्यसंस्कृती व पोषण शास्त्र | 365 |
| 109 | डॉ. राजश्री दिलीप निकम | वारसा गौरी गणेश उत्सवाचा | 368 |
| 110 | प्रा. विनोद आखाडे | सण उत्सव अंधश्रध्दा | 371 |
| 111 | प्रा. अजितकुमार भिमराव पाटील | भारतीय सण त्या मागील वैज्ञानिक कारण | 373 |

# भारतीय सणांचा आध्यात्मिक अर्थ

डॉ. एम. बी. देसाई
सहयोगी प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग,
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**गोषवारा:**
भारतीय सण-उत्सव हे समृद्धीचे निदर्शक आहेत. या सण-उत्सवांना धार्मिक, सामाजिक व आध्यात्मिक अर्थ आहे.

भूतकाळातील सर्व कडवट आठवणी विसरून नवीन वर्षाचे नव्या गोडव्यासह स्वागत करा असा सांगणारा गुढीपाडवा, कोणत्याही बाह्य आकर्षणाला भुलून त्यात वाहवत जाऊ नये असे सांगणारी होळी, अंतरंगातील सत्यापासून कधीच दूर जायच नाही असा संदेश देणारी वटपोर्णिमा केवळ बहिण-भावालाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला एका धाग्यात बांधून एक छान वीण निर्माण करणारा रक्षाबंधन, क्रोधरुपी त्रिपुरासुराचा वध करून अहंकाराचे विसर्जन करायला शिकवणारा गणेशोत्सव, मनाच्या दहा विकारांवर विजय मिळविण्यास सांगणारा नवरात्रोत्सव, नवचैतन्याची प्रेमभऱ्या रंगाची, आत्मचैतन्याची आठवण करून देणारी दिपावली, प्रेम, दया, शांती, करुणा, क्षमा यांची शिकवण देणारा मेरी ख्रिसमस, नव्या नात्यांची जपणूक करताना स्वतःमधील चुकांची प्रामाणिकपणे कबुली देणारी मकरसंक्रांत, असत्याच्या अंधारातून सत्याच्या प्रकाशाकडे नेणारा उत्सव म्हणजे रामनवमी इ. सर्वच सण-उत्सव अखिल मानव जातीच्या कल्याणाची एक नवी दृष्टी देतात.

**भारतीय सणांचा आध्यात्मिक अर्थ :**

**प्रास्ताविक :**

भारत देश हा सणवार व उत्सवांची रेलचेल असलेला देश आहे. सण-उत्सव हे समृद्धीचे निदर्शक आहेत. परंतु अनेक सण-उत्सव केवळ पूर्वापार चालत आले आहेत म्हणून आपण ते साजरे करत आहोत. या सण-उत्सवांची निर्मिती ही पूर्वजांनी विशिष्ट हेतूने खास उद्दिष्टांनी केली आहे.

प्रस्तुत शोध निबंधामध्ये आध्यात्मिकदृष्ट्या भारतीय सणांचा असलेला अर्थ विषद करण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. भारतातील विविध सण-उत्सवांची माहिती घेणे.

२. आध्यात्मिकदृष्ट्या भारतीय सण-उत्सवांचा अर्थ तपासणे.

३. आध्यात्मिकदृष्ट्या भारतीय सणांचा असलेला अर्थ मानवी जीवनाला लागू करण्याचा प्रयत्न करणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीचा वापर केला आहे. ही दुय्यम सामुग्री विविध मासिके, वर्तमानपत्रातील लेख तसेच मराठी व इग्रंजी पुस्तकातून घेतली आहे.

**विषय विवेचन:**

भारतातील प्रत्येक सणाचे पारंपारिक, धार्मिक, सामाजिक महत्व आहेच पण आध्यात्मिकदृष्ट्याही प्रत्येक सणाचा एक वेगळा अर्थ आहे. भारतातील काही प्रमुख सणांचा आध्यात्मिकदृष्ट्या असलेला अर्थ पुढीलप्रमाणे विषद करता येईल.

**१. गुढीपाडवा:** प्रत्येक सण माणसाला निसर्गाच्या जवळ घेऊन जातो आणि त्याच्याशी एकरूपता साधायला शिकवतो. असाच एक प्रमुख सण म्हणजे 'गुढीपाडवा'. भूतकाळातील सर्व कडवट आठवणी विसरून नव्या गोडव्यासह नवीन वर्षाचा आरंभ करा असा संदेश देणारा हा सण आहे. वसंताच्या आगमनाची चाहूल व वैभव म्हणजे घरोघरी डौलात सज्ज झालेल्या गुढया होय.

समजा आपल शरीर म्हणजे गुढी, त्यावरचा कलश म्हणजे आपल डोक ज्यात सतत विचारांच युद्ध सुरु असत. पण जेव्हा आपण खऱ्या अर्थाने फक्त सकारात्मक आणि आशावादी विचारांना आमंत्रित करतो तेव्हाच गुढीचा कलश चकाकू लागतो.

साखरची माळ तर सर्वांनाच हवीहवीशी वाटते पण त्यासोबत कडवटपणाचाही स्विकार करायला हवा. आकाशाशी नात जोडणारी गुढी या दोहोंना स्वतःच्या गळ्यात बांधून दिमाखात उभी असते ती वनवासातून परतणाऱ्या प्रभू श्रीरामाचे आगतस्वागत करण्यासाठी.

एका ऋतूतून दुसऱ्या ऋतूत होणाऱ्या संक्रमणादरम्यान आपल्या शरीर मन आणि बुद्धीने निसर्गाशी समायोजन कराव, जुळवून घ्याव हा या सणामधील मूळ उद्देश आहे.

**२. होळी :** होळी आणि रंगपंचमी हे सण संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. बऱ्याचदा हा सण साजरा करण्यामागे केवळ मनोरंजन हाच मूळ उद्देश दिसून येतो

होळी हा सण बऱ्याच ठिकाणी रंग खेळून साजरा केला जातो तर काही ठिकाणी लाकडाची रास पेटवून प्रतिकात्मक स्वरुपातही साजरा केला जातो. होळीमागील गर्भित अर्थ म्हणजे आयुष्याच्या प्रवाहात नात्याचे अनेक रंग पाहायला मिळतात. राग, व्देष, लोभ, मोह, ईर्ष्या, प्रेम इ. नानाविध भावना आपले अंतरंग रंगवत असतात. आपण कित्येकदा बाहयरंगात इतके अडकतो की, अंतरंग विसरुनच जातो. म्हणूनच चोखामेळा म्हणतात, "ऊस डोंगापरी रस नव्हे डोंगा, काय भुललासी वरलीया रंगा," कोणत्याही बाहय आकर्षणाला भुलून त्यात वाहवत जाऊ नये असा संदेश होळीचा सण आपल्याला देत असतो.

**३. वटपौर्णिमा:** या व्रतामागे आत्मसाक्षात्काराची कहाणी दडलेली आहे. या कहाणीचा वास्तविक अर्थ असा की, हे व्रत स्त्री -पुरुष या दोघांसाठी आहे. सत्यवानाला (स्वानुभाव) पुन्हा प्राप्त केल जाऊ शकत. परंतु त्यासाठी सावित्री(शरीर) सजग रहाणं आवश्यक आहे. सत्याबरोबर जे जोडलेले आहे ते म्हणजे सौभाग्य आणि सत्य जिथे वेगळ होत, दुरावत ती अवस्था म्हणजे वैधव्य. अंतरंगातील सत्यापासून कधीच दूर जायच नाही हाच यामागील अर्थ आहे

या सणाच्या माध्यमातून व्रत, पूजा या निमित्ताने झाडांना किमान जीवंत ठेऊन पर्यावरणाचीही काळजी घेतली जाते.

**४. रक्षाबंधन:** हा भारतीय परंपरेतील महत्त्वाचा संस्कार करणारा सण आहे. आपण आपल्या माणसांना भेटाव, त्यांच्याबरोबर ईश्वराप्रती श्रद्धा प्रकट करावी, निसर्गाशी नात जोडून बहिण-भावाच्या नात्याची छान वीण निर्माण करणारा सण म्हणजे रक्षाबंधन.

मनगट व दंड ही ताकदीची स्थाने समजली जातात. मनगटातील जोर आणि दंडातली वळकटी ही रक्षणकर्त्याच्या अंगी असायलाच हवीत म्हणून आपल्या रक्षणाची आठवण करुन देण्यासाठी बहिण भावाच्या मनगटावर आपल्या स्नेहाचा रेशीम धागा बांधत असावी. परिणाम जरी शारीरिक पातळीवर दिसला तरी मानसिक व आत्मिक पातळीवर एकमेकांवर प्रेम असणे आवश्यक आहे.

**५. गणेश चतुर्थी:** गणेशोत्सव साजरा करताना गणेशमूर्तीतील आकाराचा प्रतिकात्मक अर्थ समजून घ्यायला हवा सत्, रज्, तम या तीन गुणापलीकडील चौथीगुणातील अवस्था म्हणजे श्रीगणेश म्हणून तिला 'चतुर्थी' म्हणतात.

गणेशाचे सुपाऐवढे मोठे कान आपल्याला श्रवणशक्ती वाढविण्याचा संदेश देतात. गणेशाचे विशाल मस्तक आपल्याला समज दृढ करून विवेक बुद्धीचा वापर करण्यासाठी प्रेरित करते. विकाररुपी असुराचे निर्दालन करुन भय, चिंता व क्रोधरुपी त्रिपुरासुराचा वध करून अहंकाराच विसर्जन करुन संकुचित विचार विलीन करुन पर्यावरणपूरक गणेशचतुर्थी साजरी करण्याचा संदेश गणेशोत्सव आपल्याला देतो.

**६. नवरात्र** : भारतातील १०८ देवींचे जागरण साजरा करणारा हा ९ दिवसांचा सण आपल्याला एक महत्वाची शिकवण देतो ती म्हणजे प्रत्येक राक्षस म्हणजे मनाच्या एका विकाराचेच प्रतीक आहे. दुर्गामातेने अवतार घेऊन त्याचा वध करणे म्हणजेच आपण निर्धार करुन त्या विकारांवर विजय मिळविणे होय.

विजयादशमीला आपण रावणाचा पुतळा जाळतो. रावणाचा अर्थ सगळ्या राक्षसांचे, असुरांचे, विकारांचे संघटित रूप. रावणाचे दहा चेहरे (भीती, ईर्ष्या, वासना, तुलना इ.) या मनाच्या दहा विकारांचे प्रतिक आहे. या सर्व विकारांवर विजय मिळविण्याकरिताच आपण नवरात्रीचा सण साजरा करतो.

**७. दिपावली :** आनंदाचा, उत्साहाचा, नवचैतन्याचा झरा म्हणजे दिपावली. दिपावली दरवर्षी येणे आणि मनाचा कानाकोपरा नवचैतन्याच्या प्रकाशाने उजळून टाकते. आनंदाचे आकाशकंदील मोठ्या डौलात प्रकाशमान होऊ लागतात आणि प्रेमभऱ्या रंगांची मनमोहक रांगोळी सर्वांचेच लक्ष वेधून घेते. दिव्यांची आरास आत्मचैतन्याची आठवण करून देते.

दिपावली ही सर्वांची लाडकी पाहुणी त्यामुळे तिचा मुक्काम सहा दिवसांचा वसुबारस (गाईची पूजा), धनत्रयोदशी (धन्वंतरीची पूजा), नरकचतुर्दशी, (नरकासुरावर विजय), लक्ष्मी पूजन (लक्ष्मीची पूजा), बालप्रतिपदा व भाऊबीज हे सहा दिवस आपल्याला मोलाची शिकवण देऊन जातात. या दीपावलीचे पावित्र्य राखण्यासाठी आपण फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून पर्यावरणाचे म्हणजेच पर्यायाने मानव जातीचे रक्षण करायला हवे. तरच ही दिपावली आपल्याला जीवनात प्रेम, आनंद आणि शांतीपूर्वक जगण्याची प्रेरणा देईल.

**७. मेरी ख्रिसमस:** प्रेम, दया, करुणा, क्षमा, शांती, समर्पण अशी अनेक सद्गुणांचे आगार असणारा अथांग सागर म्हणजे येशू ख्रिस्त. येशूची शिकवण आज २१ व्या शतकातही संपूर्ण मानव जातीसाठी मार्गदर्शक आहे खर तर २५ डिसेंबर हा दिवस सर्वांसाठीच आनंदाचा अभिष्ट चिंतनाचा आणि सत्यमार्गावर अविरत चालत राहण्यासाठी प्रार्थना करण्याचा सुवर्णदीन आहे. कारण आपल आयुष्य सर्वार्थाने फुलवण्यासाठी येशूला आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. आपण आपल्या अहंकार, विकार, स्वैराचार, भ्रष्टाचार आणि निरर्थक विचारांची आहुती देण्यासाठीच हा ख्रिसमसचा सण साजरा करायला हवा.

**८. मकरसंक्रांत:** मकरसंक्रांतीच्या निमित्ताने नात्यांमधील प्रेमाचे पदर उलगडण्याची संधी प्राप्त होते. स्वतःच्या चुकांची प्रामाणिकपणे कबुली देऊन नात्यांमधील दरी नाहीशी करण्यासाठी 'तिळगूळ घ्या, गोड -गोड बोला' असे म्हणतात. बोलणाऱ्याच्या मनात गोडवा निर्माण होतो. संक्रांतीच्या निमित्ताने भविष्यात नव्या नात्यांची जपणूक करताना कोणत्या गोष्टी टाळायला हव्यात याचाही धडा मिळतो.

या सणावेळी 'मिक्स' भाजीचा आस्वाद घेण म्हणजे निसर्गाने निर्मिलेल्या वैविध्याला, सौंदर्याला आणि मांगल्याला स्वीकारणे होय.

**९. रामनवमी:** ज्या प्रभू श्रीरामांनी पृथ्वीवर देहरुपात अवतीर्ण होऊन जीवनाचा सार आपल्याला प्रत्येक कृतीतून सांगितल, त्यांची जयंती म्हणजेच रामनवमी होय.

वास्तविक रामायण म्हणजे मानवी भावभावनांची सुंदर गुफंण आहे यातील प्रत्येक घटना मनुष्याच्या अंतर्मनाचे प्रतिबिंब आहे. जेव्हा रावणाचा म्हणजेच अहंकाराचा मृत्यू होतो तेव्हाच प्रभू श्रीरामांचा म्हणजेच सर्वोच्च आनंदाचा जन्म होतो व रामनवमी येते. रामनवमी म्हणजे असत्याच्या अंधारातून सत्याच्या प्रकाशाकडे नेणारा उत्सव होय.

**निष्कर्ष:**

सण कोणताही असो त्यामागे असणारा अंतिम उद्देश म्हणजे आत्मसाक्षात्कार आणि त्यातून प्राप्त होणाऱ्या निखळ आनंदाची अभिव्यक्तीकरण हा असतो. चैत्र, गुढीपाडव्यापासून अक्षयतृतीयेपर्यंतचा कोणताही सण साजरा करताना त्यातील पावित्र्य, मांगल्य, पर्यावरण रक्षण व आध्यात्मिक अर्थ विचारात घेतल्यास या सणांकडे पाहण्याची एक नवी दृष्टी निर्माण होऊन अखिल मानव जातीचे कल्याण साध्य होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची :**


1) सुदर्शन वशिष्ठ, 'पर्व -उत्सव', सुहानी बुक्स पब्लिकेशन, दिल्ली, २००७.
2) भोसले द. ता., 'लोकसंस्कृती: स्वरूप आणि विशेष', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, मे. २००४.
3) पाध्ये दिगंबर, 'साहित्य, समाज आणि संस्कृती', न्यू एज प्रिंटींग प्रेस, मुंबई, २००१.
4) Kumar B.B., 'India-Caste, Culture and Traditions', Concept Publishing Company, Pvt. Ltd., New Delhi, 2016.
5) Patil R.B., 'Indian Society', Mittal Publications, New Delhi, 2009.
6) दृष्टीलक्ष्य मासिक विविध अंक.


TRUE COPY

Principal,
Rajarshi Ch. Shahu College
Kolhapur

TRUE COPY



Principal,
Rajarshi Ch. Shahu College
Kolhapur